# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
# वाणिज्य प्रमाण पत्र परीक्षा

-------------------------------

# लघुलेखन अभ्यासक्रम व प्रस्तावित सुधारित नियमावली २०२३

-------------------------------

## सुधारणा समिती

- प्राचार्य नितीन भोळे, अकोला
- प्राचार्या अनुराधा थिटे, अहमदनगर
- प्राचार्य संजय नाईक, धुळे
- प्राचार्य रशिद शेख, इचलकरंजी
- प्राचार्य ज्ञानेश्वर अजमिरे, पुसद
- प्राचार्य सुभाष बागड, नाशिक

---------------------------------------

**अहवाल मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना सादर**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | लघुलेखन अभ्यासक्रम - प्रस्तावना | २ |
| २ | प्रशिक्षणासाठी जागा / भौतिक सुविधाबाबत | ५ |
| ३ | प्रशिक्षीत निदेशक | ५ |
| ४ | लघुलेखन शिकण्याकरीता विद्यार्थ्यांचे शिक्षण | ६ |
| ५ | प्रवेश, प्रशिक्षण आणि परीक्षा फी | ६ |
| ६ | लघुलेखन थिअरी / परीक्षा उत्तीर्ण करावयास लागणारा कालावधी | ७ |
| ७ | इंग्रजी/मराठी/हिंदी लघुलेखन हया विषयाकरीता असणारी पुस्तके | ९ |
| ८ | परीक्षेसाठी देण्यात येणारा वेळ | ११ |
| ९ | परीक्षेसाठी असणाऱ्या पूर्व अटीबाबत तपशिल | १२ |
| १० | परीक्षांचे स्वरुप | १३ |
| ११ | गुणदान पध्दती | १७ |
| १२ | लिप्यंतरासाठी वेळेचे नियमन | १९ |
| १३ | प्रपाठयवाचकांची नियुक्ती तसेच मानधनाविषयी | २०-२१ |
| १४ | प्रश्नपत्रिका काढतांना घ्यावयाची काळजी | २२ |
| १५ | परीक्षक नियुक्ती / करावयाची कामे / मानधनाविषयी | २३ |
| १६ | समीक्षक नियुक्ती / करावयाची कामे / मानधनाविषयी | २६ |
| १७ | कॉपी प्रकरणे | २७ |
| १८ | उपाय योजना / घ्यावयाची काळजी / दखल | २८ |

# लघुलेखन अभ्यासक्रम

<u>प्रस्तावना</u> :-

“लघुलेखन” तसेच “लघुलेखक” हया संज्ञा वापरतांना त्यांचा अर्थ पहिल्यांदा समजून घेणे आवश्यक आहे. वक्त्याच्या तोंडून कितीही द्रुतगतीने शब्द बाहेर पडले तरी ते जसेच्या तसे लिहून घेता येण्याकरीता उपयोगात आणल्या जाणारी एक विशिष्ट लिपी म्हणजेच लघुलेखन ज्याला इंग्रजीमध्ये शॉर्टहॅण्ड आणि हिंदीमध्ये आशुलिपी असे म्हणतात आणि हया लिपीचा वापर करुन ऐकू येणारा प्रत्येक शब्द जसाच्या तसा लिहून त्या भाषेत लिप्यंतर करणारा म्हणजेच लघुलेखक इंग्रजीमध्ये स्टेनो तर हिंदीमध्ये ज्याला आशुलिपीक असे म्हणतात.

अगदी सरळ सोप्या भाषेत - **ऐकू येणारा आवाज लिहिण्याची कला म्हणजेच लघुलेखन - Shorthand is an art of Sound Writing तर ऐकू येणारा आवाज आलेखाच्या स्वरुपात तंतोतंत लिहून त्याच भाषेत त्याचे लिप्यंतर जसेच्या तसे टंकलिखीत करुन देणारा व्यक्ती म्हणजे लघुलेखक म्हणजेच स्टेनो** अशी व्याख्या करता येते.

सन १८३७ मध्ये सर्वप्रथम इंग्लंडमध्ये सर आयझॅक पिटमन यांनी इंग्रजी लघुलेखन - शॉर्टहॅण्ड हया कलेचा आविष्कार केला. तेव्हापासून तर आजतागायत इंग्रजी लघुलेखनासाठी एकमेव हयाच लिपीचा / कलेचा वापर संपूर्ण जगात होत आहे. त्यामुळे केंद्रासह राज्यात असलेले शासनाचे सर्व विभाग, शासकीय तसेच निमशासकीय कार्यालये, वर्तमानपत्रे, व्यापारी संस्था, कारखाने, व्यावसायिक प्रतिष्ठाने इत्यादि सर्व ठिकाणी कार्यालयीन कामकाजाचा महत्वाचा भाग असलेला पत्रव्यवहार करण्याकरीता ही कला अवगत असणाऱ्या इंग्रजी लघुलेखकांचा वापर तसेच वावर झाल्याने इंग्रजी लघुलेखकांची मोठी संख्या निर्माण झाली. लघुलेखकांमार्फत कार्यालयीन पत्रव्यवहाराचे अतिशय महत्वपूर्ण असलेले कामकाज जलद गतीने पूर्ण करण्यास उपयोग होऊ लागला, दिवसेंदिवस लघुलेखकांची उपयुक्तता वाढत गेली आणि संपूर्ण जगात जेथे जेथे

कार्यालयीन व्यवहार इंग्रजी भाषेत केले जात होते तेथे तेथे इंग्रजी लघुलेखकांची मागणी वाढत गेली. लघुलेखक म्हणजे कार्यालयीन कामकाजाचा एक कणा समजण्यात येऊ लागला. पुढे कार्यालयात लघुलेखकाला कार्यालयाच्या प्रमुखाचा स्विय्य सहाय्यक म्हणजे पि.ए. म्हणून देखील मान्यता मिळाली. कार्यालयातील अतिशय गोपनीय तसेच महत्वाचे पत्र व्यवहार त्यांच्या मार्फत केल्या जाऊ लागल्याने कार्यालयात त्यांना एक मानाचे स्थान मिळाले. कालांतराने कार्यालय प्रमुख व कार्यालयातील इतर कर्मचारी हयांच्या मधील एक दूवा म्हणूनही अत्यंत महत्वाची कामगिरी लघुलेखकाकडे आली आणि **म्हणूनच एक चांगला लघुलेखक बनण्यासाठी सर्वप्रथम लघुलेखन हया कलेची आवड, चिकाटी, मेहनत यासोबत भाषेवर प्रभूत्व, व्याकरणदृष्टया शुध्द लेखन, परिपूर्ण वाक्य रचना, संभाषण कौशल्य इ. गुण कौशल्ये विद्यार्थ्यांकडे असणे अनिवार्य झाले. आणि ही कला अवगत असलेल्या व्यक्तींना रोजगार तसेच स्वयंरोजगाराची संधी भरपूर प्रमाणात उपलब्ध होत गेली.**

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाल्यानंतर पुढे राज्य शासनाचा कारभार मराठीमध्ये होत असल्याने महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयीन पत्रव्यवहारासारख्या कामाकरीता देखील मराठी लघुलेखकांची गरज भासू लागल्याने पिटमॅनने तयार केलेल्या इंग्रजी लघुलिपीच्या आधारेच इंग्रजी लघुलेखनाच्या मुळ थेअरी चे भाषांतर मराठी मध्ये करीत मराठी लघुलिपी तयार करण्यात आली आणि याच लघुलिपीचा वापर मराठी लघुलेखकांद्वारे कार्यालयीन कामकाजात करण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्र शासनाने श्री. व. वा. ईनामदार आणि श्री. द. आ. कर्णिक यांनी तयार केलेले मराठी लघुलेखन तसेच मार्गदर्शिका महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत लघुलिपी समजण्यात येतात. केंद्र शासनाच्या व्यवहारात हिंदी हया राष्ट्रभाषेचा उपयोग होत असल्याने हिंदी लघुलेखनाकरीता देखील सन १९६९ साली इंग्रजी लघुलेखनाच्या मुळ थेअरी वर आधारीत पिटमैन एस.एस. पब्लीकेशन द्वारे औद्योगिक परिशिक्षण, श्रम मंत्रालय, भारत सरकार द्वारा मान्यता असलेली नविन आशुलिपी एवं कुंजी तयार करण्यात आली.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मी. ते १६० श.प्र.मी., मराठी लघुलेखन ६० श.प्र.मी. ते १२० श.प्र.मी. तसेच हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मी. ते १२० श.प्र.मी. अशा एकूण १६ विषयांच्या जी.सी.सी. परीक्षांना** प्रविष्ट होण्यासाठी संस्थांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद केलेल्या विषयानुरुप लघुलिपीचे प्रशिक्षण दिले जाते, त्यांच्याकडून परीक्षेची शास्त्रशुध्द पध्दतीने तयारी करुन घेतली जाते व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासन, राज्य शासनाच्या कोणत्याही विभागात तसेच कार्पोरेट क्षेत्रात आजच्या संगणकीय युगात देखील रोजगार तसेच स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत घेतल्या जाणाऱ्या G.C.C. - वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ८० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या कोणत्याही विभागात लघुटंकलेखक (Steno-Cum-Typist) हया पदावर, इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन १०० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या कोणत्याही विभागात निम्न श्रेणी लघुलेखक (Lower Grade Stenographer) हया पदावर इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन १२० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या कोणत्याही विभागात लघुटंकलेखक (Higher Grade Stenographer) हया पदावर नियुक्ती, तर इंग्रजी लघुलेखन १३० / १४० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात स्विय्य सहाय्यक (P.A.) तसेच मंत्रालयात Parliament Reporter तर वर्तमान पत्रांमध्ये Reporter म्हणून नियुक्ती मिळवून रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरीता सर्वत्र शास्त्रशुध्द पध्दतीने लघुलेखनाची कला अवगत करुन Speed & Accuracy असणाऱ्या विद्यार्थ्यांची आजच्या संगणकीय युगात देखील नितांत आवश्यकता आहे.

प्रस्तावनेनंतर आता आपण लघुलेखन अभ्यासक्रमाशी निगडीत असलेल्या प्रत्येक बाबींचा सखोल विचार करु.

## प्रकरण - १

### शासनमान्य संस्थेत लघुलेखन प्रशिक्षणासाठी जागा / आवश्यक भौतिक सूविधा :-

१. ज्या संस्थेत लघुलेखन हा विषय विद्यार्थ्यांना शिकविली जातो त्या संस्थेत प्रशिक्षणासाठी किमान 10’x10’ हया आकाराचा स्वतंत्र वर्ग असावा.
२. विद्यार्थ्यांना बसण्याकरीता रायटिंग पॅड असलेल्या खुर्च्या / डेस्क बेंच / टेबल आणि स्टूल ची व्यवस्था वर्गात असावी.
३. एका बॅचसाठी किमान १० ते १५ विद्यार्थी लाभ घेऊ शकतील अशा भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.
४. लघुलेखन विषय शिकविण्याकरीता संस्थेत व्हाईट बोर्ड / फळा असावा
५. वर्गामध्ये पुरेसे फर्निचर, स्वच्छ प्रकाश तसेच मोकळी हवा राहण्याकरीता विजेची व पंख्यांची सोय असावी.
६. प्रशिक्षण वर्गाजवळ गोंगाट, कोणत्याही प्रकारचा गोंधळ तसेच रस्त्यावरील वाहनांच्या वर्दळीचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.
७. प्रशिक्षण वर्गात नेहमी शांतता असावी.

## प्रकरण - २

### प्रशिक्षित निदेशक :-

इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन शिकविण्यासाठी संस्थेचे प्राचार्य वा नियुक्त करावयाचे निदेशक -

- ❖पदविधर असावे (केवळ एस.एस.सी. किंवा एच.एस.सी. उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता असलेल्यांच्या तुलनेत पदविधरांचे भाषेचे ज्ञान, वाक्यरचना, व्याकरणदृष्टया परिपक्वता, भाषेचा अभ्यास आणि भाषेवरील प्रभूत्व निश्चीतच अधिक आहे)
- ❖संस्थेच्या प्राचार्यांनी इंग्रजी / मराठी / हिंदी १२० श.प्र.मी. हया विषयाची तर निदेशकाने किमान १०० श.प्र.मी. हया विषयाची जी.सी.सी. परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.
- ❖निदेशकांना संस्थेत नियुक्ती देण्याकरीता किमान एक वर्ष लघुलेखन शिकविण्याचा अनूभव असावा

## प्रकरण - ३

**लघुलेखन शिकण्याकरीता विद्यार्थ्यांचे शिक्षण :-**

इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ही कला अवगत करु इच्छिणारा विद्यार्थी किमान एस.एस.सी. उत्तीर्ण असावा म्हणजे उज्वल भविष्याच्या दृष्टीने त्याला घ्यावयाच्या पुढील महाविद्यालयीन शिक्षणासोबतच त्याला लघुलेखनाचा अभ्यासक्रम पूर्ण करता येणे सहज शक्य आहे. एस.एस.सी. नंतर त्याला पदवी मिळविण्याकरीता लागणाऱ्या पाच वर्षाच्या कालावधी दरम्यान लघुलेखनाच्या थेअरीचा अभ्यासक्रम पूर्ण करुन जास्तीत जास्त तिन ते साडे तिन वर्षात शासनाच्या लघुटंकलेखक ते स्विय्य सहाय्यक या पदाकरीता आवश्यक असणाऱ्या शॉर्टहॅण्डच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण करता येतील व लघुलेखन ही कला चांगल्याप्रकारे अवगत करुन एक चांगला लघुलेखक बनण्याची संधी त्याला निश्चीतच प्राप्त होईल. आणि अगदी योग्य वेळी जिवनात त्याला रोजगार आणि स्वयंरोजगार मिळविता येईल.

## प्रकरण - ४

**प्रवेश, प्रशिक्षण आणि परीक्षा फी :-**

- ❖ **प्रवेश शुल्क** :- रुपये १००/-
- ❖ **प्रशिक्षण शुल्क** :- रुपये १,०००/- प्रति महिना
- ❖ **परीक्षा शुल्क** :- रुपये ४००/- G.R.नूसार
- ❖ **परीक्षा सामग्री / आयोजन शुल्क** :- रुपये ६००/- G.R. नूसार

**टिप :- दर तिन वर्षांनी परीक्षा शुल्क / प्रशिक्षण शुल्क यात १० टक्के वाढ करण्यात यावी**

## प्रकरण - ५

## प्रशिक्षण (शॉर्टहॅण्डची थिअरी) पूर्ण करण्यास लागणारा कालावधी :-

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखनाचा अभ्यासक्रम म्हणजेच **थिअरी पूर्ण करण्याकरीता विद्यार्थ्याने दर रोज नियमीतपणे किमान तिन ते चार तास अभ्यास केल्यास निश्चीत पणे एक वर्षाचा वेळ लागतो.** या कालावधीत श्रूतलेखन करण्याकरीता म्हणजेच Dictation घेण्याकरीता आवश्यक असणाऱ्या शॉर्टहॅण्डच्या थिअरी पुस्तकातील प्रत्येक प्रकरणामध्ये असलेले नियम समजावून घेउन आत्मसात करणे, प्रत्येक पाठातील संकेताकृतीचा अभ्यास करणे, प्रत्येक अभ्यास गिरविणे, प्रत्येक शब्दांकरीता पुस्तकात दर्शविलेल्या संकेताकृतींचा सराव करणे, इत्यादि प्रत्येक विद्यार्थ्यांकरीता करणे सहज सोपे आणि शक्य आहे.

## प्रकरण - ६

## परीक्षा उत्तीर्ण करण्याकरीता लागणारा कालावधी :-

साधारणत: एस.एस.सी. उत्तीर्ण असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याचा कोणत्याही भाषेत शब्द लिहिण्याचा स्पिड साधारणपणे ३० ते ४० श.प्र.मी. एवढा निश्चीतच आहे. आणि म्हणूनच एक वर्षाचा लघुलेखन थिअरीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर म्हणजेच पुस्तकातील प्रत्येक प्रकरणामध्ये असलेल्या सर्व नियमांचे आकलन झाल्यानंतर रोज नियमीत पणे श्रूतलेखन करणे, (Dictation) काढलेल्या संकेताकृती (Out lines) वाचणे, त्याच भाषेमध्ये त्याचे लिप्यंतर करणे (Transcription) असा दैनंदिन अभ्यास केल्याने पुढील सहा महिन्याच्या कालावधीत लिहिण्याच्या सरावाने २० श.प्र.मी. एवढा लिहीण्याचा स्पिड वाढवून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत घेण्यात येणाऱ्या पहिल्या इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मी. हया विषयाचे श्रूतलेखन करण्याची गती त्याला प्राप्त करता येणे सहज शक्य आहे.

**शॉर्टहॅण्डच्या ६० ते १२० श.प्र.मी. हया चार परीक्षांचा विचार केल्यास कोणत्याही दोन परीक्षांच्या विषयांमध्ये २० श.प्र.मी. एवढा फरक तर इंग्रजी शॉर्टहॅण्ड १३० ते १६० श.प्र.मी. या परीक्षांच्या विषयांमध्ये १० श.प्र.मी. एवढा फरक असल्याने एकाच सत्रात एकाच वेळी दोन परीक्षांच्या विषयाची तयारी कोणत्याही विद्यार्थ्याला करता येणे केव्हाच शक्य नाही**. स्पष्ट करावयाचे झाल्यास जानेवारी मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही भाषेच्या ६० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा दिली, आणि लगेच पुढील परीक्षेच्या तयारीकरीता नियमीत Dictaion घेत सराव केला आणि निकाल जाहीर झाल्यानंतर परीक्षेत उत्तीर्ण झा ल्यास माहे जूलै मध्ये घेण्यात येणाऱ्या ८० श.प्र.मी. हया विषयाच्या परीक्षेची तयारी त्या विद्यार्थ्याला करता येणे अगदी सहज शक्य आहे **कारण ६० श.प्र.मी. आणि ८० श.प्र.मी. हया दोन परीक्षांमध्ये २० श.प्र.मी. एवढा फरक आहे, आणि परीक्षेनंतर लगेच जानेवारी ते जून अश्या सहा महिन्याच्या Dictaion च्या सरावाने विद्यार्थ्यांना Out lines काढण्याचा स्पिड वाढविणे सहज शक्य आहे. परंतू ८० सोबतच १०० म्हणजे त्याने प्रविष्ट केलेल्या/उत्तीर्ण केलेल्या परीक्षेच्या विषयात आणि लगेच पुढील सत्रात १०० श.प्र.मी. चा विचार केल्यास ४० श.प्र.मी. एवढा Out lines काढण्याचा स्पिड वाढविता येणे केवळ अशक्य आहे कदापी शक्य नाही. तेव्हा शॉर्टहॅण्डच्या कोणत्याही परीक्षेला प्रविष्ट होण्याकरीता त्या अगोदरची परीक्षा उत्तीर्ण असणे ही पूर्व अट असावी आणि प्रत्येक सत्रात फक्त एकाच परीक्षेचे आवेदन पत्र भरण्याची परवानगी देण्यात यावी.**

वर स्पष्ट केल्याप्रमाणे नियमीत Dictation घेऊन लिहिण्याचा सराव केल्यास प्रत्येक सहा महिन्याच्या सत्रात २० श.प्र.मी. एवढा संकेताकृती काढण्याचा स्पिड वाढवित ६० श.प्र.मी. या विषयाची परीक्षा उत्तीर्ण केलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला पुढील प्रत्येक सहा महिन्याच्या सत्राच्या प्रत्येक परीक्षेस अनूक्रमे इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ८० श.प्र.मी., १०० श.प्र.मी., १२० श.प्र.मी. हया तिन्ही परीक्षा प्रविष्ट होण्याकरीता असलेल्या पूर्व अट पूर्तता करुन प्रत्येक सत्रात

उत्तीर्ण केल्यास **इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी. अशा एकूण चार परीक्षा उत्तीर्ण करण्यास एकूण अडीच वर्षाचा कालावधी लागतो.**

आजतागायत राज्य शासन, केंद्र शासनाच्या कोणत्याही शासकीय / निमशासकीय विभागात लघुटंकलेखक (Steno-cum-typist) ते स्विय्य सहाय्यक (P.A.) या पदांकरीता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (G.C.C.) इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ८० ते १२० श.प्र.मी. **तर** पार्लमेंट रिपोर्टर (Parliament Reporter) या पदावर नोकरी मिळविण्याकरीता इंग्रजी लघुलेखन १३० / १४० श.प्र.मी. हया विषयांची परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. **तेव्हा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या इंग्रजी लघुलेखन १५० / १६० श.प्र.मी. हया दोन विषयाच्या परीक्षा रद्द करण्यास कोणतीही हरकत नाही.**

## प्रकरण - ७

## लघुलेखन शिकण्याकरीता आणि शिकविण्याकरीता अत्यंत उपयोगी असणारी पुस्तके

➢ **इंग्रजी लघुलेखनाकरीता :-**

❖ Pitman Shorthand Instructor & Key
❖ 700 Common Words and Dictation Exercises
❖ Miscellaneous Correspondence Part I, II & III
❖ K.S. Ayyar’s Phraseography
❖ Four Minutes Dictation Book
❖ Five Minutes Dictation Book
❖ G.C.C. Exam Papers with outlines (Old)
❖ हया शिवाय बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी पुस्तके

- **मराठी लघुलेखनाकरीता :-**

- श्री. व.वा. इनामदार आणि श्री. द.आ. कर्णिक यांचे मराठी लघुलेखन
- श्री. व.वा. इनामदार यांचे मराठी लघुलेखन मार्गदर्शिका
- श्री. व.वा. इनामदार यांचे मराठी गतिवर्धक श्रुतलेखन
- G.C.C. Exam Papers with outlines (Old)
- हया शिवाय बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी पुस्तके

- **हिंदी लघुलेखनाकरीता :-**

- पिटमैन एस.एस. पब्लीकेशनचे नवीन आशुलिपी एवं कुंजी
- डॉ. आ.म. साजनानी यांचा मानक आशुलिपी उच्च गति वाक्यांश कोष
- G.C.C. Exam Papers with outlines (Old)
- हया शिवाय बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी पुस्तके

## प्रकरण - ८

**परीक्षांसाठी वेळेची मर्यादा :-**

**परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना प्रपाठयवाचकाने Trial Passage नंतर डिक्टेक्ट केलेल्या फक्त पॅसेज A & B च्या लिप्यंतरासाठी (फक्त Long Hand मध्ये लिहिण्याकरीता) खाली नमूद केल्यानूसार वेळ दिला जातो.**

| **अ.क्र.** | **परीक्षेचा विषय** | **गती निहाय परीक्षेचा विषय** | **परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना पॅसेज A & B च्या लिप्यंतरासाठी देण्यात येणारा कालावधी** |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | १ तास १५ मिनीटे |
| | | ८० श.प्र.मी. | १ तास ४० मिनीटे |
| | | १०० श.प्र.मी. | २ तास |
| | | १२० श.प्र.मी. | २ तास ३० मिनीटे |
| | | १३० श.प्र.मी. | २ तास ४० मिनीटे |
| | | १४० श.प्र.मी. | २ तास ५० मिनीटे |
| | | १५० श.प्र.मी. | २ तास ५५ मिनीटे |
| | | १६० श.प्र.मी. | ३ तास ०५ मिनीटे |
| २ | मराठी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | १ तास १५ मिनीटे |
| | | ८० श.प्र.मी. | १ तास ४० मिनीटे |
| | | १०० श.प्र.मी. | २ तास |
| | | १२० श.प्र.मी. | २ तास ३० मिनीटे |
| ३ | हिंदी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | १ तास १५ मिनीटे |
| | | ८० श.प्र.मी. | १ तास ४० मिनीटे |
| | | १०० श.प्र.मी. | २ तास |
| | | १२० श.प्र.मी. | २ तास ३० मिनीटे |

## प्रकरण - ९

## पूर्व अट पूर्तता तपशिलाबाबत

| अ. क्र. | परीक्षेचा विषय | गती निहाय विषय | पूर्व अट पूर्तता करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन (G.C.C.)/संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ३० श.प्र.मी. |
| | | ८० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ३० श.प्र.मी.+ इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १०० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन ५० श.प्र.मी. / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ४० श.प्र.मी. + इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १२० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन ५० श.प्र.मी. / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ४० श.प्र.मी. + इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १३० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन ५० श.प्र.मी. / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ४० श.प्र.मी. + इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मी. |
| | | १४० श.प्र.मी. | इंग्रजी - टंकलेखन ५० श.प्र.मी. / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ४० श.प्र.मी. + इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मी. |
| | | | |
| | | | |
| २ | मराठी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | मराठी - टंकलेखन (G.C.C.) / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ३० श.प्र.मी. |
| | | ८० श.प्र.मी. | मराठी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ३० श.प्र.मी.+ मराठी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १०० श.प्र.मी. | मराठी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ४० श.प्र.मी.+ मराठी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १२० श.प्र.मी. | मराठी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ४० श.प्र.मी.+ मराठी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| ३ | हिंदी लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) | ६० श.प्र.मी. | हिंदी - टंकलेखन (G.C.C.) / संगणक टंकलेखन (G.C.C.-T.B.C.) ३० श.प्र.मी. |
| | | ८० श.प्र.मी. | हिंदी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ३० श.प्र.मी. + हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १०० श.प्र.मी. | हिंदी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ४० श.प्र.मी.+ हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मी. |
| | | १२० श.प्र.मी. | हिंदी - टंकलेखन / संगणक टंकलेखन ४० श.प्र.मी.+ हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मी. |

<u>**प्रकरण - १०**</u>

## परीक्षांचे स्वरुप

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारे घेण्यात येणाऱ्या जी.सी.सी. परीक्षांना प्रविष्ट होत असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत ४ - ४ मिनीटांच्या दोन पॅसेजेस चे तज्ञ प्रपाठयवाचकांकडून डिक्टेशन दिले जाते. परीक्षेमध्ये डिक्टेट करावयाच्या पॅसेज A व पॅसेज B चे वाचन करावयाच्या अगोदर प्रत्येक प्रपाठयवाचकांना विद्यार्थ्यांना त्यांचे उच्चार समजून घेण्यासाठी तसेच त्यांच्या आवाजाची ओळख होण्याकरीता २ मिनीटांच्या Trial Passage चे वाचन करणे अनिवार्य असते, परंतू विद्यार्थ्यांना Trial Passage चे Transcription करावयाचे नसते. शॉर्टहॅण्ड मध्ये आऊट लाईन काढलेल्या पॅसेजेस ला लॉन्ग हॅण्ड मध्ये लिहिण्याकरीता वर नमूद केल्यानूसार विषयानुरुप वेळ त्यांना दिला जातो.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पूणे द्वारा घेण्यात येणाऱ्या शॉर्टहॅण्डच्या एकूण १६ विषयांच्या परीक्षांपैकी फकत इंग्रजी शॉर्टहॅण्ड ६० श.प्र.मी. आणि ८० श.प्र.मी. या दोन विषयांच्या परीक्षेकरीता दोन Sections मध्ये विभागणी केली आहे. त्याच प्रमाणे मराठी / हिंदी लघुलेखन ६० आणि ८० श.प्र.मी. या दोन विषयांच्या परीक्षेकरीता सुध्दा दोन विभागात विभागणी करण्यात यावी. कारण शॉर्टहॅण्ड हया प्रशिक्षणाची मूळ थिअरीची संकल्पना ही सर आयझॅक पिटमॅन यांची असल्याने इंग्रजी प्रमाणेच मराठी / हिंदी लघुलेखनाच्या पुस्तकाच्या लेखकांनी इंग्रजी थेअरीच्या प्रकरणांचे जसेच्या तसे भाषांतर मराठी / हिंदी मध्ये केले असल्याने ते अतिशय योग्य आणि अनिवार्य आहे हया विषयी अधिक स्पष्टीकरण असे करावेसे वाटते ते असे की -**

इंग्रजी शॉर्टहॅण्ड या विषयाची थिअरी, बेसिक शिकण्याकरीता तसेच शिकविण्याकरीता फक्त महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर संपूर्ण विश्वात सर आयझॅक पिटमॅन यांनी तयार केलेल्या

एकमेव लिपीचे पुस्तक प्रसिध्द झालेले असून English Shorthand Instructor & Key याच पुस्तकाचा उपयोग लघुलेखन शिकण्याकरीता तसेच शिकविण्याकरीता केला जातो. आणि परीक्षेला प्रविष्ट होण्याकरीता विद्यार्थी सदर पुस्तकातील सर्व Lessons समजावून घेउन सर्व Exercises मध्ये असलेल्या Out Lines चा नमुनाबर हुकूम काटेकोरपणे सराव करुन तयारी करतात. म्हणजे इंग्रजी शॉर्टहॅण्डची थेअरी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही शब्दाची संकेताकृती जगात कुठेही काढली असता त्यात कोणताच बदल वा फरक होणार नाही, किंबहूना आपल्या मनाने त्याला वेगळी कोणतीही संकेताकृती काढता देखील येणार नाही. आणि शॉर्टहॅण्ड या विषयाचे मूळ स्वरुप इंग्रजी असल्याने डिक्टेशन घेऊन परीक्षेकरीता प्रविष्ठ होण्याकरीता आवश्यक तेवढा थिअरी अभ्यासक्रम पूर्ण करुन परीक्षेमध्ये सदर बाबींचा ऑब्जेक्टीव्ह स्वरुपात समावेश केलेला असल्याने विद्यार्थी तेवढा अभ्यासक्रम पूर्ण करुनच परीक्षेला प्रविष्ठ होतात तसेच शासनमान्य संस्थांतील सर्व प्राचार्य तसेच निदेशक हे देखील सदर नमूद केलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्याने पूर्ण केल्यानंतरच परीक्षेला प्रविष्ठ होण्यास सांगतात. की जेणेकरुन **जी.सी.सी. परीक्षेमध्ये इंग्रजी शॉर्टहॅण्ड ६० आणि ८० श.प्र.मी. या दोन्ही विषयांच्या परीक्षेमध्ये विभाग १ मध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकातील संपूर्ण थिअरी वर आधारित (Grammalogues, Special Contractions, Advanced Phraseography & Intersections) असलेले २० गुण मिळविण्याकरीता प्रश्नपत्रिकेत सांगीतलेल्या शब्दांची फक्त संकेताकृती काढून इतर कोणत्याही परीक्षेत असणाऱ्या ऑब्जेक्टीव प्रश्नांप्रमाणेच पूर्ण पैकी पूर्ण गूण मिळविणे सहज शक्य होते.**

**इंग्रजी ६०/८० श.प्र.मी. या परीक्षेसाठी विभाग १ मध्ये थियरी वर आधारीत ३० गुणांच्या ऑब्जेक्टीव्ह प्रश्नांची परीक्षा घेणे प्रस्तावित आहे. त्यानूसार आता इंग्रजी ६०/८० श.प्र.मी. या परीक्षेसाठी एकूण दोन विभागात खालील प्रमाणे परीक्षा घेण्याचे प्रस्तावित करीत आहोत**

**इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मी. - एकूण गूण १००**

**विभाग १ (Section I) - Marks ५०, Time allowed ४० Minutes**

ज्यामध्ये इंग्रजी लघुलेखनाच्या थिअरीवर आधारीत सांगीतलेल्या शब्दांच्या संकेताकृती काढणे अभिप्रेत आहे -

- **Grammalogues - शब्दचिन्हे : ८ Marks**
- **Phrases - संकेत समुच्चय : ६ Marks**
- **Contractions/Intersections - संक्षिप्त संकेत : ६ Marks**
- **थिअरीवर आधारित ऑब्जेक्टीव प्रश्न : ३० Marks**

**विभाग २ (Section II) Dictation**

**Passage A - ५० Marks - ४५ + ५ for note taking**
**Passage A च्या Dictation साठी - ४ Minutes.**
**Long Hand मध्ये लिहिण्याकरीता - ३५ Minutes**

**इंग्रजी लघुलेखन ८० श.प्र.मी. - एकूण गूण १००**

**विभाग १ (Section I) - Marks ५०, Time allowed ४० Minutes**

ज्यामध्ये इंग्रजी लघुलेखनाच्या थिअरीवर आधारीत सांगीतलेल्या शब्दांच्या संकेताकृती काढणे अभिप्रेत आहे -

- **Grammalogues - शब्दचिन्हे : ८ Marks**
- **Phrases - संकेत समुच्चय : ६ Marks**
- **Contractions/Intersections - संक्षिप्त संकेत : ६ Marks**
- **थिअरीवर आधारित ऑब्जेक्टीव प्रश्न : ३० Marks**

**विभाग २ (Section II) Dictation**

**Passage A - ५० Marks - ४५ + ५ for note taking**
**Passage A च्या Dictation साठी - ४ Minutes.**
**Long Hand मध्ये लिहिण्याकरीता - ६० Minutes**

**उर्वरित खाली नमूद केलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेकरीता मात्र परीक्षा पध्दती एक सारखी असून ती खाली नमूद केल्या प्रमाणे आहे :-**

- **इंग्रजी शॉर्टहॅण्ड १०० श.प्र.मी. ते १६० श.प्र.मी.**
- **मराठी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी.**
- **हिंदी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी.**

**Marks - १०० Time allowed for Dictation of Passage A & Passage B - ४ Minutes (each)**

- **Passage A - ५० Marks - ४५ + ५ for note taking**
- **Passage B - ५० Marks - ४५ + ५ for note taking**

**परंतू मराठी / हिंदी लघुलेखनाची वेग वेगळया लेखकांची पुस्तके असल्याने मराठी / हिंदी ६० आणि ८० श.प्र.मी. या विषयांच्या परीक्षेत इंग्रजी ६० आणि ८० श.प्र.मी. विषयाच्या परीक्षेत असणाऱ्या विभाग १ प्रमाणे Objective परीक्षा घेता येणे शक्य नाही**

**परीक्षेबाबत अत्यंत महत्वाचे :-**

**१. शॉर्टहॅण्डच्या कोणत्याही परीक्षेला विद्यार्थ्यांना प्रविष्ठ व्हावयाचे असल्यास त्यांना त्या परीक्षेकरीता असलेली पूर्व अट परीक्षा फॉर्म भरतांना पूर्तता करणे अनिवार्य असावे.**

**२. परीक्षेमध्ये आजतागायत विद्यार्थ्यांना लॉन्ग हॅण्ड मध्ये लिहिण्याकरीता उत्तर पत्रिकेवर पेनाने लिहिणे आवश्यक आहे.**

## प्रकरण - ११

### गुणदान पध्दती

**इंग्रजी शॉर्टहॅण्ड ६० आणि ८० श.प्र.मी. करीता**

**विभाग - १ (Section - I), Marks :- ५०**

हा विभाग इंग्रजी लघुलेखनाच्या थिअरीवर आधारित असून विद्यार्थ्याने प्रश्नात सांगीतलेली कोणतीही संकेताकृती चूकविल्यास १ गूण कमी करण्यात येतो आणि हया विभागात उत्तीर्ण होण्याकरीता विद्यार्थ्याला ५० पैकी २५ म्हणजेच ५० टक्के गूण मिळविणे अनिवार्य आहे.

- **Grammalogues - शब्दचिन्हे : ८ Marks**
- **Phrases - संकेत समुच्चय : ६ Marks**
- **Contractions/Intersections - संक्षिप्त संकेत : ६ Marks**
- **थिअरीवर आधारित ऑब्जेक्टीव प्रश्न : ३० Marks**
- एकूण गूण : ५०
- उत्तीर्ण होण्याकरीता आवश्यक : २५

**विभाग - २ (Section - II), Marks :- ५०**

**Passage A - ५० Marks : ४५ for Transcription + ५ for note taking**

हया विभागात गुणदान करतांना विद्यार्थ्यांमध्ये Long Hand मध्ये केलेल्या Transcription मध्ये केलेल्या तिन चुकांकरीता १ गूण कमी केला जातो त्याचप्रमाणे विराम चिन्हांसाठी (जसे पूर्ण विराम, स्वल्पविराम, प्रश्नार्थक चिन्ह, उदगारवाचक चिन्ह इ.) सर्व मिळून ३ गूण कमी करण्यात यावे हया प्रमाणे ६० चुकांपर्यंत गुणदान करुन त्यानंतर झालेल्या चूकांकरीता गुणदान न करता त्या पॅसेजला ० गूण दिले जातात कारण परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरीता हया विभागात देखील विद्यार्थ्याला ५० टक्के गूण मिळविणे अनिवार्य आहे.

- **इंग्रजी शॉर्टहॅण्ड १०० श.प्र.मी. ते १६० श.प्र.मी.**
- **मराठी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी.,**
- **हिंदी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी.**

**वरील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता :**

**Marks :- १००**

**Passage A - ५० Marks : ४५ for Transcription + ५ for note taking**

**Passage B - ५० Marks : ४५ for Transcription + ५ for note taking**

वरील सर्व विषयांचे गुणदान करतांना विद्यार्थ्यांनी Long Hand मध्ये केलेल्या Transcription मध्ये विराम चिन्हांसाठी (जसे पूर्ण विराम, स्वल्पविराम, प्रश्नार्थक चिन्ह, उदगारवाचक चिन्ह इ.) सर्व मिळून ३ गूण कमी करण्यात यावे आणि कोणत्याही स्वरुपात केलेल्या चूका जसे शब्दांच्या स्पेलींगमधील चुक, मराठी/हिंदी मध्ये ऱ्हस्व आणि दिर्घ, डिक्टेशन घेतांना सुटलेले शब्द, पॅसेज मध्ये नसून चूकून लिहिलेला शब्द इत्यादी अशा तिन चूकांकरीता १ गूण कमी करावा, हया प्रमाणे ७५ चुकांपर्यंत गुणदान करुन त्यानंतर झालेल्या चूकांकरीता गूणदान

न करता त्या पॅसेजला ० गूण दिले जातात कारण परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरीता प्रत्येक पॅसेज मध्ये विद्यार्थ्याला ५० टक्के गूण मिळविणे अनिवार्य आहे. परंतू कोणत्याही विद्यार्थ्याला ० गूण न देता उत्तर पत्रिकेत लिहीलेला पॅसेज परीक्षकांनी पूर्ण तपासून एकूण झालेल्या चुकांमधून तिन चुकांकरीता एक गूण कमी करीत जेवढे गूण विद्यार्थ्याला मिळत असतील तेवढे द्यावे, की जेणेकरुन विद्यार्थ्यांना आपण Long Hand मध्ये पॅसेज लिहितांना किती चूका करतो याबद्यल माहिती होईल.

इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखनाच्या प्रत्येक विषयाच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी १०० पैकी ५० गूण मिळविणे विद्यार्थ्याला आवश्यक आहे परंतू असे निदर्शनास आले आहे की, ४६, ४७,४८, ४९ गूण मिळालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत अनुत्तीर्ण केले जाते, त्यासाठी टंकलेखन आणि संगणक टंकलेखन या विषयासाठी असलेल्या सवलतीच्या गुणाच्या तरतूदीप्रमाणे लघुलेखन परीक्षेत वरील सर्व विषयांसाठी सवलतीचे ५ गूण देण्यात यावे.

## <u>प्रकरण - १२</u>

**<u>लिप्यंतरासाठी वेळेचे नियमन :-</u>**

प्रपाठयवाचकाच्या आवाजाची ओळख व्हावी आणि उच्चार समजण्याकरीता प्रत्येक परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना दोन मिनीटांचा एक Trial Passage देणे अनिवार्य आहे परंतू विद्यार्थ्यांना सदर Trial Passage चे Transcription करावयाचे नसते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या इंग्रजी लघुलेखन ६० ते १६० श.प्र.मी., मराठी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी. आणि हिंदी लघुलेखन ६० ते १२० श.प्र.मी. अश्या १६ विषयांकरीता परीक्षेला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेत **फक्त Passage A & B हया दोन पॅसेजेस चे डिक्टेशन घेऊन त्यांना त्याच विषयाच्या भाषेत Long Hand मध्ये Transcription करणे अनिवार्य असून लिप्यंतरासाठी वर नमूद केल्याप्रमाणे वेळ देण्यात येतो.**

# प्रकरण - १३

## प्रपाठयवाचन (Dictation) देणारी व्यक्ती प्रपाठयवाचक (Reader/Dictator) :-

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या जी.सी.सी. परीक्षेतसाठी परीक्षा केंद्रावर प्रपाठयवाचक म्हणून खाली दिलेल्या निकषांनूसार नियुक्ती करण्यात यावी -

१. प्रपाठयवाचक हे फक्त शासन मान्यता असलेल्या लघुलेखन संस्थेमध्ये लघुलेखन हा विषय नियमीत शिकविणारे संस्थेचे प्राचार्य वा निदेशक/शिक्षक असावेत. केवळ लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची प्रपाठयवाचक म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये.

२. प्रपाठयवाचकाची नियुक्ती आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे किंवा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे कार्यालयाकडून करण्यात यावी आणि तक्रार असलेल्या परीक्षा केंद्रावर आवश्यकता असेल तेथे शेजारील जिल्हयातून प्रपाठयवाचकाची नियुक्ती करावी.

३. प्रपाठयवाचक इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन १०० / १२० श.प्र.मी. ची परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असावे. याप्रमाणे जो प्रपाठयवाचक ज्या विषयाची परीक्षा उत्तीर्ण असेल, त्याच विषयासाठी त्यांची प्रपाठयवाचक म्हणून नेमणूक करावी.

४. डिक्टेशन देतांना प्रत्येक शब्दाचे स्पष्ट उच्चार करणाऱ्या आणि मोठया आवाजात वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला ऐकू येईल असा आवाज असणाऱ्याच प्रपाठयवाचकाची नियुक्ती करण्यात यावी

५. प्रपाठयवाचकाने विद्यार्थ्याने डिक्टेशन नोटबूकवर पेन्सील ने काढलेल्या संकेताकृतींच्या शेवटी स्वाक्षरी करावी, डिक्टेशन नोटबूकवर संकेताकृती काढलेली नसल्यास तसा अभिप्राय डिक्टेशन नोटबूकवर लिहावा, स्वाक्षरी करावी व सर्व कोऱ्या पानांवर पेनाने रेषा माराव्या

६. प्रश्नपत्रिकेत दर्शविलेल्या १५/३०/४५/६० सेकंदाच्या खुणांप्रमाणे अगदी अचूकतेने गतीचे नियंत्रण ठेवून निर्धारित वेळेत पॅसेजेस चे प्रपाठयवाचन प्रपाठयवाचकांना करता येणे अनिवार्य असावे. परीक्षेकरीता नियुक्त केलेल्या प्रपाठयवाचकांना प्रपाठयवाचन करतांना गतीवर नियंत्रण ठेवता आले नसेल तर त्यांची संपादणूक केंद्रसंचालकांकडून तात्काळ रद्द करण्यात यावी, त्यासंबंधी लेखी अहवाल परीक्षा परिषदेकडे पाठवावा आणि पुन्हा कधीही संबंधित अशा प्रपाठयवाचकाची नियुक्ती करण्यात येऊ नये.

७. लघुलेखक म्हणजेच स्टेनो हया पदावर कार्यरत असणाऱ्या कोणत्याही कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रपाठयवाचक म्हणून नियुक्ती कदापिही करण्यात येऊ नये कारण कोणत्याही लघुलेखकांना त्यांच्या संपूर्ण सेवेत फक्त डिक्टेशन घ्यावे लागते त्यांना डिक्टेशन देण्याचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसल्याने परीक्षेत डिक्टेक्ट करावयाच्या पॅसेजेसचे वाचन ते निर्धारित वेळेत पूर्ण करु शकत नाहीत.

## प्रकरण - १४

**प्रपाठयवाचकांचे मानधन :-**

सन २०१२-१३ मध्ये जी.सी.सी. परीक्षांचे परीक्षा शुल्काची आकारणी जी.आर. मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित नियमानूसार केली जाते परीक्षा शुल्कात वाढ झाल्याने केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, शिपाई, परीक्षक तसेच समीक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनात कालानुरुप बदल आणि आवश्यक तेवढी वाढ करुन परीक्षा परिषदेकडून सदर वर नमूद केलेल्या प्रपाठवाचकाच्या मानधनात बदल करुन प्रपाठयवाचकांना पूर्वी देण्यात येणारा दैनिक पुरक भत्ता आणि **प्रपाठयवाचनाचे मानधन यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ न करता माहे मे २०१३ पासून फक्त एका दिवसात दोन विषयाच्या दोन बॅचच्या प्रपाठयवाचनाकरीता रोजंदारीप्रमाणे रुपये २००/- प्रति दिवस आणि मागील जी.सी.सी. परीक्षेपासून २५०/- रुपये प्रति दिवस हयाप्रमाणे मानधन अदा करण्यात येते.**

तेव्हा शॉर्टहॅण्डच्या परीक्षेत परीक्षार्थींना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने प्रपाठयवाचनाचे महत्वपूर्ण आणि जबाबदारीपर्वूक काम करीत सर्वात महत्वाची भूमीका अदा करणाऱ्या प्रपाठयवाचकांना खाली नमूद केल्याप्रमाणे मानधन अदा करण्यात यावे

- **दैनिक पुरक भत्ता :- रुपये ३००/-**
- **प्रपाठयवाचनाचे मानधन :- रुपये २५०/- प्रति बॅच प्रति विषय**

**म्हणजे परीक्षा केंद्रावर घेण्यात येणाऱ्या एका दिवसाच्या कोणत्याही एका विषयाच्या दोन बॅचच्या परीक्षेच्या प्रपाठयवाचनाकरीता फक्त रुपये ८००/-**

- ✓ **परीक्षा केंद्रावर कोणत्याही एका विषयाच्या एका डिक्टेशन बॅचमध्ये - विद्यार्थी संख्या - कमाल २५ असावी आणि परीक्षा केंद्रावर सदर विषयाच्या परीक्षेला प्रविष्ठ होणारे आणि परीक्षेला हजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास २५ विद्यार्थ्यांची एक बॅच हया प्रमाणे बॅचेस तयार करुन प्रति बॅच प्रपाठयवाचनाचे मानधन रुपये २५०/- प्रति बॅच या प्रमाणे अदा करण्यात यावे**

## प्रकरण - १५

### प्रश्नपत्रिका तयार करतांना घ्यावयाची काळजी :-

**१.** इंग्रजी/मराठी/हिंदी लघुलेखन हया विषयाच्या प्रश्नपत्रीका जे शिक्षक तयार करतात त्यांना पुरेसा अनूभव असावा.

**२.** प्रश्नपत्रीका तयार करतांना परीक्षेसाठी १५/३०/४५/६० सेंकदानंतर १ मिनीट हयाप्रमाणे चार मिनीटांचे मार्कींग पॅसेज मध्ये असावे.

**३.** इंग्रजी भाषेची प्रश्नपत्रीका तयार करतांना शब्द मोजण्याची पध्दत प्रत्येक शब्दाला एक हया प्रमाणात असावी.

**४.** मराठी/हिंदी भाषेमध्ये मात्र विभक्ती प्रत्ययांचे आणि अव्ययांचे वेगवेगळे शब्द मोजावे.

**५.** प्रत्येक पॅसेज मध्ये तिन ते चार परिच्छेद असावेत.

**६.** पॅसेजमध्ये आकडेवारी, विशेष नाम, इत्यादीचा उपयोग वारंवार टाळावा.

**७.** परिच्छेद अ रोजच्या दैनंदिन व्यवहरातील घडामोडींवर असावा. त्यामध्ये अलंकारीत, वाङ्मयीन किंवा विज्ञानावर आधारीत शब्दरचना त्यामध्ये टाळावी.

**८.** परिच्छेद ब शक्यतो व्यापारी पत्र, कंपनी अहवाल किंवा एखादे भाषण हयावर आधारीत असावा.

**<u>प्रकरण - १६</u>**

**<u>परीक्षक हया पदांवरील नियुक्ती</u>** :-

- ✓ परीक्षक हया पदाकरीता फक्त कोणत्याही मान्यता प्राप्त संस्थेमध्ये लघुलेखन विषय शिकविण्याऱ्या निदेशक / प्राचार्य यांची नियुक्ती करण्यात यावी.
- ✓ परीक्षकाने इंग्रजी/मराठी/हिंदी लघुलेखन हया विषयाची किमान १०० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असावे

**<u>प्रकरण - १७</u>**

**<u>परीक्षकाला पेपर तपासतांना जबाबदारी तसेच गोपनियतेने करावयाची कामे</u> :-**

१. परीक्षकाने उत्तर पत्रिका लाल शाईने तपासाव्यात तसेच उत्तर पत्रिका तपासतांना ज्या चूका असतील त्या दर्शविण्याकरीता लाल शाईने तिरपी रेघ द्यावी

२. उत्तर पत्रिकेत विद्यार्थ्यांनी Transcription करतांना कोणत्याही गाळलेल्या किंवा जास्तीच्या लिहीलेल्या शब्दांकरीता एक गोल करावा, एक चूक धरावी आणि राहीलेली ओळ मोकळया जागेत लिहीली तर चूक धरु नये. लिप्यंतर करतांना विद्यार्थ्याने परीक्षकाला वाचता येईल अशा सुवाच्छ अक्षरात लिहावे तसेच लिप्यंतर करतांना इंग्रजी मध्ये Cursive Writing मध्ये लिहीले असेल तर ते ग्राहय धरावे.

३. पूर्ण पॅसेज तपासून झाल्यानंतर शेवटी विद्यार्थ्याने लिहीतांना केलेल्या चूका मोजून अंकात लिहाव्या त्याचप्रमाणे सूटलेले / वगळलेले / जास्तीचे लिहीलेले शब्द मोजून ते वेगळया अंकात लिहावे आणि दोन्हीची बेरीज करुन विद्यार्थ्याने उत्तर पत्रिकेत पॅसेज लिहीतांना केलेल्या एकूण चूकांची संख्या लिहावी.

४. परीक्षकाने दोन्हीही पॅसेज A & B पूर्ण तपासणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्याने संकेताकृती काढतांना फक्त एखादा शब्द इंग्रजी/मराठी मध्ये लिहिला असेल तर कॉपी केस समजू नये.

५. परीक्षकाने प्रत्येक पॅसेज तपासून झाल्यानंतर शेवटी मिळालेले गूण त्याच ठिकाणी लिहावे.

६. परीक्षकाने विद्यार्थ्यांनी काढलेल्या संकेताकृतींकरीता असलेले गूण संकेताकृतींच्या खालीच लिहावे.

७. उत्तर पत्रिका तपासतांना कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद वाटणाऱ्या उत्तर पत्रिका तपासून त्यावर लेखी अभिप्राय देऊन त्या वेगळया सिलबंद पाकीटात मूल्यमापन अधिकाऱ्यांकडे द्यावी.

८. परीक्षा केंद्रावर ट्रायल पॅसेज देऊन झाल्यानंतर पोहोचलेल्या विद्यार्थ्याच्या डिक्टेशन नोट बूक मध्ये ट्रायल पॅसेज घेतला नसल्याचा शेरा लिहून केंद्र प्रमुखांनी/प्रपाठयवाचकाने स्वाक्षरी करावी.

९. पेपर काढतांना चूकीने जास्त ओळी किंवा जास्तीचा पॅरीग्राफ आला असेल तर ते सर्व पेपर तपासतांना जास्त आलेल्या ओळी किंवा पॅरीग्राफच्या जास्त चूका झाल्या असतील तर त्या माफ करुन गुणदान करण्यात यावे.

१०.कंपनीच्या किंवा व्यक्तीच्या नांवाचे स्पेलींग दोन प्रकारे होत असल्यास जर प्रश्न पत्रिकेत जसे आहे तसे नसेल तर विद्यार्थ्याने लिहीलेल्या स्पेलिंगची चूक धरण्यात येऊ नये.

## प्रकरण - १८

**परीक्षकांचे मानधन** :-

परीक्षकांना खाली नमुद केल्यानूसार मानधन अदा केले जाते :-

| | | |
|---|---|---|
| ❖**एक उत्तर पत्रीका तपासण्याकरीता** | **:-** | **रुपये १५/-** |
| ❖**दैनिक भत्ता** | **:-** | **रुपये १००/-** |
| ❖**बाहेर गांवाच्या परीक्षकांसाठी** | **:-** | **रुपये १५०/-** |

परीक्षकांकडून एका दिवसात तपासल्या जाणाऱ्या उत्तर पत्रीकांच्या मानधनाच्या दृष्टीने विचार केल्यास वर नमुद केलेले मानधन हे अत्यंत कमी असून त्यामध्ये वाढ करण्यात यावी. कारण इंग्रजी/मराठी/हिंदी या विषयाच्या फक्त ६०/८० श.प्र.मी. तसेच मराठी/हिंदी लघुलेखन १०० ते १२० श.प्र.मी. हया विषयांची एक उत्तर पत्रीका तपासण्याकरीता किमान ४० ते ४५ मिनीटांचा वेळ लागतो.

तेव्हा परीक्षा परिषदेकडून अदा करण्यात येणाऱ्या मानधनात योग्य ती वाढ करण्यात यावी, आणि खाली नमूद केल्यानूसार मानधन अदा करावे, अशी अपेक्षा आहे.

| | | |
|---|---|---|
| **६० आणि ८० विषयाच्या एक उत्तर पत्रीका तपासण्याकरीता** | **:-** | **रुपये ३०/-** |
| **१०० आणि त्यापूढील विषयाच्या एक उत्तरी पत्रीका तपासण्यासाठी** | **:-** | **रुपये ४०/-** |
| **दैनिक भत्ता** | **:-** | **रुपये ३००/-** |
| **बाहेर गांवाच्या परीक्षकांसाठी** | **:-** | **रुपये ५००/-** |

**दर तिन वर्षांनी मानधनामध्ये १० टक्के वाढ करण्यात यावी**

## प्रकरण - १९

**समीक्षक हया पदांवरील नियुक्ती** :-

- ✓समीक्षक हया पदाकरीता फक्त कोणत्याही मान्यता प्राप्त संस्थेमध्ये लघुलेखन विषय शिकविण्याऱ्या निदेशक / प्राचार्य यांची नियुक्ती करण्यात यावी.
- ✓समीक्षकाने इंग्रजी/मराठी/हिंदी लघुलेखन हया विषयाची किमान १२० श.प्र.मी. हया विषयाची परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असावे
- ✓समीक्षक हया पदावर नियक्ती होण्याकरीता त्याने किमान पाच परीक्षांमध्ये परीक्षक म्हणून काम केलेले असावे.

## प्रकरण - २०

**समीक्षकाला समीक्षण करतांना घ्यावयाची जबाबदारी तसेच गोपनियतेने करावयाची कामे**

१. समीक्षकाने उत्तर पत्रिका हिरव्या शाईने तपासाव्यात तसेच उत्तर पत्रिका तपासतांना ज्या चूका असतील त्या दर्शविण्याकरीता हिरव्या शाईने तिरपी रेघ द्यावी

२. परीक्षकाने तपासलेल्या उत्तर पत्रिकेत निदर्शनास आलेल्या चूका स्वतंत्र पणे काढून दाखवाव्यात

३. परीक्षकाने पूर्ण पॅसेज तपासून झाल्यानंतर शेवटी विद्यार्थ्याने लिहीतांना केलेल्या चूका मोजून अंकात लिहाव्या त्याचप्रमाणे सूटलेले / वगळलेले / जास्तीचे लिहीलेले शब्द मोजून ते वेगळया अंकात लिहावे आणि दोन्हीची बेरीज करुन विद्यार्थ्याने उत्तर पत्रिकेत पॅसेज लिहीतांना केलेल्या एकूण चूकांची संख्या बरोबर आहे की नाही याची खात्री करुन घ्यावी

४. परीक्षकाने दोन्हीही पॅसेज A & B पूर्ण तपासले आहेत की नाही हे बघावे

५. परीक्षकाने प्रत्येक पॅसेज तपासून झाल्यानंतर शेवटी मिळालेले गूण त्याच ठिकाणी लिहीले आहेत की नाही हे तपासून घ्यावे

६. परीक्षकाने विद्यार्थ्यांनी काढलेल्या संकेताकृतींकरीता असलेले गूण संकेताकृतींच्या खालीच लिहीलेले आहे की नाही हे तपासून घ्यावे

७. उत्तर पत्रिका तपासतांना परीक्षकांना कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद वाटणाऱ्या उत्तर पत्रिका तपासून त्यावर लेखी अभिप्राय दिला असल्यास त्यावर आपला स्वतंत्र अभिप्राय लिहून वेगळया सिलबंद पाकीटात मूल्यमापन अधिकाऱ्यांकडे द्यावी.

## प्रकरण - २१

**समीक्षकांचे मानधन** :-

समीक्षकांना उत्तर पत्रीकाचे समीक्षण करण्याकरीता खाली नमुद केल्यानूसार मानधन अदा केले जावे :-

- **१० टक्के - उत्तर पत्रीकाच्या समीक्षकणाकरीता :- रुपये ३०/-**
- **९० टक्के - उत्तर पत्रीकाच्या समीक्षकणाकरीता :- रुपये १५/-**
- **दैनिक भत्ता :- रुपये ३००/-**
- **बाहेर गांवाच्या परीक्षकांसाठी :- रुपये ५००/-**

**दर तिन वर्षांनी मानधनामध्ये १० टक्के वाढ करण्यात यावी**

**वरील सर्व प्रस्तावित मानधन वाढ परीक्षा परीषदेच्या कार्यकारी समीतीच्या मंजूरीनंतर करण्यात येईल.**

## प्रकरण - २२

**कॉपी प्रकरणे :-**

बऱ्याच परीक्षा केंद्रांवर कॉपी प्रकरणांचे प्रकार उघडकीस आलेले आहेत ते साधारणत: खाली नमुद केल्याप्रमाणे आहोत :-

१. परीक्षेकरीता प्रपाठ्यवाचकांनी परीक्षा केंद्रावर प्रत्येक विषयाच्या पॅसेजेसला डिक्टेशनकरीता दिलेल्या निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ घेउन डिक्टेशन देणे.
२. परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर प्रत्येक विषयाच्या पॅसेजेसला लाँगहँड मध्ये लिहिण्याकरीता दिलेल्या निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ घेऊन पॅसेज लिहीणे.
३. परीक्षेकरीता असलेल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्याच्या उत्तर पत्रीकेत एकाच पध्दतीने पॅसेज लिहीलेला असणे.
४. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी असलेल्या पॅसेजेसचे डिक्टेशन न देता पॅसेजचे हळूवार वाचन करून पॅसेज जसाच्या तसा विद्यार्थ्यांकडून लिहून घेणे
५. उत्तर पत्रिकेवर परीक्षेकरीता असलेले दोन्हीही पॅसेजेस अगदी विराम चिन्हांसह जसेच्या तसे लिहिलेले असेल आणि सर्व कोराकृत्या अगदी अचूक काढलेली असणे.

## प्रकरण - २३

### त्यावर उपाय योजना आणि घ्यावयाची दखल/काळजी

१. कोणत्याही परीक्षा केंदावरील कॉपी प्रकरण उघडकीस आल्यास संबंधित परीक्षा केंद्रावर कार्यवाही करण्यात येऊन तेथे परीक्षा घेण्यात येऊ नये.
२. संबंधीत परीक्षा केंद्रावर त्यावेळी कार्यरत असणाऱ्या परीक्षा केंद्रप्रमुख, वर्गावरील सुपरवायझर सह सहयोगी असणाऱ्या तसेच हस्तक्षेप असणाऱ्या व्यक्तींवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी आवश्यकता वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करावा.
३. हया प्रकरणी मान्यता प्राप्त असणाऱ्या संस्थेचा सहभाग वा हस्तक्षेप आढळल्यास संस्थेची शासन मान्यता काढून घ्यावी आणि संबंधीत संस्थेच्या संस्थाचालक, प्राचार्य यांचेवर गुन्हा दाखल करण्यात यावा.
४. परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. कॅमेरा असणे बंधनकारक असावे.
५. प्रत्येक परीक्षेच्या वेळी तेच तेच केंद्रप्रमुख व सुपर वायजर यांची नेमणूक करण्यात येऊ नये.